**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सन्मित्र सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था,
२६/२०४, बनवडी कॉलनी, कराड, जि. सातारा — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक भूमी अभिलेख,
तहसिलदार कंपौंड, हजेरी बंगला, पोवई नाका, सातारा — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
मार्केट यार्ड कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **३४/२०१०/ सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | **दि. १६-९-२००९** |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | **दि. ३१-१०-२००९** |
| ४ | प्रथम अपीलाची तारीख | **दि. ३-१२-२००९** |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | **दि. २२-१२-२००९** |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे करण्यात येणारे अपील हे व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक आहे, संस्थेच्या नावे नाही, सबब, सन्मित्र सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था यांचे नावे आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच मोजणी चुकीची असणे, फाळणी उतारा चुकीचा असणे या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७-०१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती शकिनाबी अजमुद्दीन मुलाणी
सहशिक्षिका, प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता.करमाळा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४३/ सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१९.६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.०१.२००६ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.२.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.३.२००६ |
| | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्त्यांने शास्तीचा आग्रह धरला होता.

यापुर्वी श्रीमती मुलाणी यांच्या अपील क्र १६९/सोलापूर या अपिलाची सुनावणी दि.२८.९.२००७ रोजी घेण्यात आली असून सुनावणी आदेश दि.१२.२.२००८ रोजी आयोगाने दिला आहे. सदर आदेशानुसार

श्रीमती मुलाणी यांचे हे अपील व अपील क्र. १६९/सोलापूर यातील विषय एकच असल्याने, तसेच दि. १२.२.२००८ च्या आदेशानुसार अपिलकर्त्यास माहिती मिळाली आहे, हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे --

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १३.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१) श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर **अपीलकर्ता**
जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक,
श्री दिनकररावजी नलावडे नागरी सहकारी पत संस्था मर्या.
मडिलगे बु//, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर

२) श्री. धोंडीराम ज्ञानदेव गुरव (मूळ अर्जदार)
मु.पो.मडिलगे बु//, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक, **उत्तरवादी**
सहकारी संस्था. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उप व्यवस्थापक,
श्री दिनकररावजी नलावडे नागरी सहकारी पत संस्था मर्या.मडिलगे बु//,
ता.भूदरगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **३४४/ कोल्हापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-१२-२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-१२-२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याो उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-१२-२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४-०३-२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०३-२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री. धोंडीराम ज्ञानदेव गुरव, श्रीमती आनंदी ज्ञानदेव गुरव यांचे २ वर्षापुर्वी सोने लिलाव केले त्या लिलावाच्या कार्यपध्दतीबाबतची कागदपत्रे, दोन्ही खात्यांचा खाते उतारा, रु.१०००/- पेक्षा अधिक ठेवींच्या कार्यपध्दतीची कागदपत्रे इत्यादी एकूण ७ मुद्दे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दिनांक ९-७-२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्याने अपिलाची दिनांक १८-१२-२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मूळ अर्जदार श्री. धोंडीराम ज्ञानदेव गुरव, मु.पो.मडिलगे, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर यांनी उप व्यवस्थापक, श्री दिनकररावजी नलावडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या, मडिलगे बु//, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मागीतली असता सदर माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील दाखल केले. अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेश दिले. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशा विरुध्द जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक, श्री दिनकररावजी नलावडे नागरी सहकारी पत संस्था मर्या. मडिलगे बु//, यांनी आयोगाकडे अपील केले आहे. नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँका व पत संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांचे उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

१) अपील मान्य कारण्यात येत आहे..

२) अपीलकर्ता श्री शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांनी मूळ माहिती मागणी अर्जावर केलेली कार्यवाही ग्राह्य धरण्यात येत आहे. व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा मूळ प्रकरणातील निर्णय रद्द करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०-१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शामराव सखाराम पाटील **अपीलकर्ता**
मु.पो.मौजे सांगाव, ता.कागल,
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** **उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर.
२) **जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कागल,
जि.कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **३५/२०१०/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१२.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कागल यांनी दिनांक २०/११/२००९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, तसेच मौजे सांगाव येथील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व सर्व कुटुंबांचे शौचालय असलेबाबतच्या दाखल्यांची सत्य प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री शामराव सखाराम पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब जोडलेले नाही. तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब, श्री पाटील यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखल स्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-१-२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सागर काशीनाथ टोपले — अपीलकर्ता
मु.पो.आजरा, गणेश मंदिर समोर, रवळनाथ
मंदिर परिसर, आजरा, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. सागर काशीनाथ टोपले
मु.पो.आजरा, गणेश मंदिर समोर, रवळनाथ मंदिर
परिसर, आजरा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
श्री. डी. पी. डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा — सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आजरा, जि. कोल्हापूर श्री. टी. बी. बल्लाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे आपण स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था, आजरा जि. कोल्हापूर यांच्याबाबतची माहिती मागितली होती. त्यांनी अर्ज संस्थेकडे हस्तांतरित केला. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू होत नसल्याचे कळवून संस्थेने माहिती नाकारली. माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी देऊनही संस्थेने माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सागर काशिनाथ टोपले यांनी केली.

संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे पतसंस्थेचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

सौ. शारदा राजेंद्र माळवदकर
द्वारा अमोल बाबु भोसले द्वारा
तेजस परदेशी, श्रीसाईनाथ लॉन्ड्री, एअरपोर्ट
रोड, नागपूर चाळ, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा कारागृह उपनिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा स्वीय सहाय्यक,
कारागृह उपनिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६५/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता**
सौ. शारदा राजेंद्र माळवदकर
द्वारा अमोल बाबु भोसले द्वारा
तेजस परदेशी, श्रीसाईनाथ लॉन्ड्री, एअरपोर्ट रोड,
नागपूर चाळ, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा
कारागृह उपनिरीक्षक, पश्चिम विभाग,
येरवडा, पुणे-६ श्री. रविंद्र केदारी

**जन माहिती अधिकारी** तथा
स्वीय सहाय्यक,
कारागृह उपनिरीक्षक, पश्चिम विभाग,
येरवडा, पुणे-६ श्री. एच.एल. कचके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.३.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन २००५ मध्ये कारागृह उप महानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या कार्यालयातर्फे झालेल्या तुरूंगरक्षक भरतीच्या संदर्भातील ५० मुद्दयांची माहिती अपीलकर्त्या सौ. शारदा राजेंद्र माळवदकर यांनी मागितली होती. त्याला विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. नंतर, अपिलीय प्राधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे यांच्या आदेशानुसार सर्व मुद्दयांची छाननी करून माहिती दिली, त्यास तीन दिवस विलंब झाला. सौ. माळवदकर यांच्या अर्जातील मुद्दे श्री. अमोल बाळू भोसले या कारागृह खात्यातून काढून टाकलेल्या रक्षकाशी संबंधित अशी होती. दिलेली माहिती श्री. भोसले यांनीच स्वीकारली. संबंधित भरती प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याकडून तपास सुरु असल्यामुळे काही कागदपत्रे त्या विभागाकडे असून त्यांच्याकडून घेण्याबाबत कळविले होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोळा अधिकारी / कर्मचारी यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून खटला दाखल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. तसेच या प्रकरणी शासनाच्या आदेशानुसार ज्या रक्षकांच्या सेवा समाप्त केल्या त्यात श्री. अमोल बाळू भोसले यांचा समावेश असून त्यांनी केलेला अर्ज महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात प्रलंबित आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक, कारागृह उप महानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे श्री. एच. एल. कचके यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता देय माहिती देण्यात आल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र प्रतापराव मोहिते
रेठरे बु., शिवनगर, ता.कराड, जि.सातारा — मूळ अर्जदार

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि.,
रेठरे बु. शिवनगर, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**मूळ अर्जदार** श्री.राजेंद्र प्रतापराव मोहिते
रेठरे बु., शिवनगर, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बु. शिवनगर, ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.बी.एन.पाटील | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन २००६ मध्ये शेतकरी संघटनेने केलेल्या ऊस दरवाढ आंदोलनामध्ये मोडतोड झालेली वाहने व जखमी झालेल्या व्यक्ती आदींबाबतची माहिती मूळ अर्जदार श्री.राजेंद्र प्रतापराव मोहिते यांनी मागितली होती. आंदोलनातील ते एक नेते असून त्यांच्याविरूध्द पोलिसांमध्ये गुन्हा दाखल आहे. त्यात संबंधित कागदपत्रे दाखल केली आहेत, तसेच नुकसानीसाठी अपीलकर्ता थेट जबाबदार असल्यामुळे अशा व्यक्तीला माहिती देणे कायदेशीरदृष्ट्या अडचणीचे आहे. मात्र कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व अहवालात सर्व तपशील देण्यात आला आहे. तरीही श्री.मोहिते यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपील केले. कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, हे आपले प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक

सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे यांनी अमान्य केले व अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश दिला. हा आदेश बेकायदेशीर असून रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.बी.एन.पाटील यांनी केली.

कारखान्याच्या अहवालात नमूद केलेल्या नुकसानीसंदर्भात आपण माहिती मागितलेली आहे. ऊस दरवाढ आंदोलनात आपल्यावर एकही गुन्हा दाखल नाही, असे प्रतिपादन मूळ अर्जदार श्री.मोहिते यांनी केले.

आपल्यापुढे केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असा आपण निकाल दिला. 'वास्तविक यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शासनाची मदत मिळालेली आहे व शासनाच्या आर्थिक मदतीतूनच कारखान्याची उभारणी झालेली अहे. त्यामुळे कारखान्याला कायदा लागू होत नाही, हे म्हणणे योग्य नाही. तसेच कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारखान्याची नोंद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये झालेली असल्या कारणाने यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना हा सार्वजनिक प्राधिकरण आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी त्यांच्या दि.१४.११.२००७ निकालपत्रात नमूद केले आहे. ते लक्षात घेता कारखान्याने माािहती नाकारणे योग्य ठरणार नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत संबंधित कागदपत्रांचे अवलोकन अपीलकर्त्यास करू द्यावे व नियमानुसार देय ठरणारी माहिती १५ दिवसात अपीलकर्त्यास देऊन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बु. पो.शिवनगर, ता.कराड, जि.सातारा यांनी आयोगाला अहवाल सादर करावा. १०० पानापर्यंतची माहिती नि:शुल्क द्यावी व ऊर्वरित माहितीसाठी नियमानुसार शुल्क आकारावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बु. पो.शिवनगर, ता.कराड, जि.सातारा यांनी आयोगाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे यांनी दि.१०.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि.२५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१.

श्री.वासुदेव कोंडुमल इदनानी
२७/३,पी.डब्ल्यू.डी.क्वार्टर्स,
पिंपरी कॉलनी, पुणे-३७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्य.),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणाधिकारी (माध्य.),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७३+३७४+८३४/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२६.५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.७.२००६ व ४.८.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.८.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.८.२००६,१६.९.२००६ व दि. २.८.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.८.२००६ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-ब) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२६.५.२००८ रोजी आयोजील केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलांचा समावेश होता.

सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री.वासुदेव कोंडुमल इदनानी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद,पुणे श्री.प्रकाश परब हे उपस्थित होते. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद,पुणे श्री.प्रकाश परब यांनी अपीलकर्त्यास माहिती (चौकशी अहवाल) देण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३०/ ०६/२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. कमलाकर दत्ताजीराव धनवडे — अपीलकर्ता
११३२, ई वॉर्ड, साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम विभाग क्र.१, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७३ + ४४४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. कमलाकर दत्ताजीराव धनवडे
११३२, ई वॉर्ड, साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप शहर नगर रचनाकार, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री. आर.के. मस्कर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता, बांधकाम विभाग क्र.१, पवडी कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत व तत्कालीन श्री. एम.एम.निर्मळे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३७३/ कोल्हापूर | २४.१२.२००७ | २३.१.२००८ | ७.५.२००८ | ५.३.२००८ |
| ४४४/ कोल्हापूर | २४.१२.२००७ | २३.१.२००८ | ७.५.२००८ व ३०.५.२००८ | ५.३.२००८ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

सिटी सर्व्हे क्र.१३६३.अ, १३६३.ब व १३६४ मध्ये सन १९८० पूर्वी झालेल्या बांधकामाच्या अनुषंगाने माहिती मागणारे विविध अर्ज आपण सन २००१ पासून करीत असून जुनी बांधकामे अधिकृत करून घेण्याच्या प्रयत्नात कागदपत्रे नष्ट केली आहेत. आपल्या मालकीची जमीन एका माजी नगराध्यक्षांना बेकायदेशीरपणे देण्यात आली असल्यामुळे व १९५० साली झालेली कब्जेपट्टी व पंचनामा बनावट केला असल्यामुळे माहिती दिली जात नाही. या सर्व प्रकारांची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. कमलाकर दत्ताजीराव धनवडे यांनी केली.

श्री. धनवडे यांनी वेळोवेळी याच विषयासंदर्भातील माहिती मागितली असून त्या त्या वेळी त्यांना उपलब्ध कागदपत्रे देण्यात आली आहेत. कब्जेपट्टी व पंचनाम्याच्या प्रतींचा शोध सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्या कार्यालयातही घेण्यात आला. परंतू तेथेही त्या प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यांनी उल्लेख केलेल्या इमारतींचे बांधकाम १९८० पूर्वीचे असून त्याबाबतची कागदपत्रे क वर्गातील असल्यामुळे जतनाची मुदत ५ वर्षे असते. सदर प्रकरणी न्यायालयात दावा प्रलंबित आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, विभाग क्र.१ पवडी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एम. एम. निर्मळे यांनी केले. १९८० पासूनचे अभिलेख तपासले असता त्यात फक्त सिटीएस क्र. १३६३ ची सन २००६ मध्ये दिलेल्या परवानगीची माहिती मिळाली. त्यांच्या अर्जात कोणताही निश्चित कालावधी नोंदविला नसूनही शोध घेण्याचा प्रयत्न केला, असे अभिलेख लिपिक श्री. एन.एस.पाटील यांनी नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी या प्रकरणी संबंधित असणाऱ्या सर्व विभागांची अपीलकर्त्यांसह एकत्रित बैठक घेऊन अभिलेखाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १२.१.२००९ रोजी बैठक घेऊन सर्व कागदपत्रांबाबतची वस्तुस्थिती सन १९४४ पासूनच्या अनेक नोंदींसह श्री. धनवडे यांना स्पष्ट करण्यात आली. सिटीएस क्र.१३६३ व १३६४ हे एकच असल्याबाबत नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर यांनी प्रमाणित करावे, अशी मागणी श्री. धनवडे यांनी केली. त्याबाबत खात्री करून नगर भूमापन अधिकारी यांना तसे कळवावे, असे आदेश बैठकीत देण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी

तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री. गणेश एन. देशमुख यांनी दि. १२.१.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.

श्री. धनवडे यांची मूळ तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. तसेच त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक आयोजित करून पूरक कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री. गणेश एन. देशमुख यांनी केली आहे. श्री. धनवडे यांनी स्वतः अथवा अन्य संबंधित व्यक्तींमार्फत त्याच विषयासाठी पुन:पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करू नये, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २१ .९.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आप्पासाहेब बाबू पाटील
काडगे मळा, पानवेली बिल्डिंग, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रबंधक,
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८०/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१.२००९ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रबंधक,<br>महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, कोल्हापूर प्रतिनिधी सौ.वि.एस.ढाले | | |
| ४ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.आप्पासाहेब बाबू पाटील यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केला नव्हता, तर कूळ कायदा प्रकरणातील आदेशाची नक्कल मागणारा अर्ज केला होता. संबंधित संचिका महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, कोल्हापूर यांच्याकडे पाठविल्याचे अपीलकर्त्यास कळविले होते. तसेच त्यांच्या अर्जातील नमूद क्रमांकानुसार कागदपत्रे पाहिली असता पक्षकार वेगळे असल्याचे कळविले व त्यांच्या संदर्भातील प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध करून दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी सौ.वि.एस.ढाले यांनी केले. ते लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.शरद रामण्णा शेट्टी
प्लॉट नं.१४, प्रेमप्रभा,
वीरभद्रनगर,गणराज मंगल कार्यालयाजवळ,
बाणेर, पुणे-४५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
सिम्बॉयसिस कॉलेज,
अभिमत विद्यापीठ, सेनापती बापट मार्ग,
गणेशखिंड, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
सिम्बॉयसिस कॉलेज,
अभिमत विद्यापीठ, सेनापती बापट मार्ग,
गणेशखिंड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८३ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१२.६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०६.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०८.२००६ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१२.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. तथापि अपीलकर्ता श्री.शरद रामण्णा शेट्टी या कार्यक्रमास गैरहजर होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे वतीने ॲड, शिवाजी सिंग हे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री.शेट्टी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार प्रथम अपील कुलपती (राज्यपाल) विधानभवन, मुंबई-३२ यांचेकडे करण्याऐवजी संस्थेच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे करणे आवश्यक होते. श्री.शेट्टी यांनी मागितलेली माहिती विस्तृत व सरसकट स्वरुपात माहिती मागितली आहे. संस्थेने त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक :** ३० /०३/२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे — अपीलकर्ता
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, ता. जयसिंगपूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
श्री. धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा — सचीव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
सौ. आसावरी चंद्रकांत कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या कर्ज प्रकरणासंदर्भातील माहिती धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व सचीवांनी दिली नाही. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे यांनी केली.

आपल्या संस्थेला शासनाचे कोणतेही अनुदान वा भाग भांडवल मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसूनही माहिती देण्याचा प्रयत्न केला. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, ता. जयसिंगपूर यांच्या पत्रानुसार श्री. बारवाडे यांना त्यांच्या दोनही पत्यांवर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, परंतु त्यांनी ती स्वीकारली नाही. अपीलकर्ता सातत्याने वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज करुन त्रास देत आहेत व माहितीचा गैरवापर करीत आहेत, असे प्रतिपादन संस्थेच्या सचीव सौ. आसावरी चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच संस्थेने माहिती देऊ केल्याचे उभय बाजूंच्या निवेदनांवरून व कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय केरबा बिडकर — अपीलकर्ता
कोल्हापूर-सांगली-रोड, जिल्हा बँक शाखा
हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८५/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. दत्तात्रय केरबा बिडकर, कोल्हापूर-सांगली-रोड, जिल्हा बँक शाखा, हातकणंगले, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. शिवाजी पांडुरंग पाटील — अपीलकर्ता

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर जि. कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा — उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. बी.आर.डोंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.६.२००८ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

वडगाव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या संदर्भात आपल्याला जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी कोणतीही माहिती दिली नाही. विनामूल्य माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दिला. परंतु राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करेपर्यंत कोणतीही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तात्र केरबा बिडकर यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. शिवाजी पांडुरंग पाटील यांनी केली.

माहिती तयार असल्याचे अपीलकर्त्यास कळविले होते. अपिलामध्ये निःशुल्क माहिती देण्याचे आदेश झाले. त्यानुसार माहिती तयार ठेवली होती व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी ती समक्ष देऊ केली, असे जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले श्री. बी. आर. डोंगळे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने पाहता अपीलकर्त्यांनी उप निबंधक, सहकारी संस्था, ता. हातकणंगले यांच्या कार्यालयातून स्वतः माहिती स्वीकारावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. वामनराव हिंदूराव शेटे
मु. पो. नरंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, शिवगंगा सह. पाणी पुरवठा संस्था मर्या., नरंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. वामनराव हिंदूराव शेटे<br>मु. पो. नरंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. बी.आर.डोंगळे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री शिवगंगा पाणी पुरवठा संस्था मर्यादित, नंरदे, ता. हातकणंगले या संस्थेबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री शिवगंगा पाणी पुरवठा संस्था मर्यादित, नंरदे यांच्याकडे मागितली होती. तथापि माहिती मिळाली नाही. संस्थेविरुध्द तक्रार नोंदविण्यासाठी आपल्याला ही माहिती मिळणे आवश्यक होते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. वामनराव हिंदूराव शेटे (वय ९१ वर्षे) यांनी केले.

संबंधित माहिती संस्था स्तरावरील असल्याने अर्ज संस्थेकडे पाठविला. परंतु संस्थेला शासनाचे भागभांडवल व आर्थिक मदत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे व त्यामुळे माहिती देत नसल्याचे संस्थेने श्री. शेटे यांना कळविले. आपल्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती दिली. संस्थेला २५ टक्के शासकीय अनुदान मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो व त्यामुळे संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी केले

अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांचे निवेदन लक्षात घेता संस्थेने अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती द्यावी. त्याची पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची राहील. त्यानुसार अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अहवाल आयोगाला प्राप्त झालेला नाही. दि. ३०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाने या संदर्भात सचीव व उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांच्याकडून खुलासा मागविला असून त्यांनी तो अद्याप केलेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२.      आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेली कार्यवाही व त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास झालेला विलंब याबद्दलचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री शिवगंगा पाणी पुरवठा संस्था मर्यादित, नंरदे, व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले श्रीमती एन.व्ही. गायकवाड यांनी दि. ३०.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. अन्यथा तें कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.विजयसिंह जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती फलटण,
ता.फलटण, जि.सातारा विद्यमान-डॉ.व्ही.व्ही.पोटे, तत्कालीन-डॉ.आर.एम.जगदाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२०८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांनी कळविलेले शुल्क भरून न घेता माहिती देत असल्याचे सांगून प्रत्यक्षात माहिती देण्याची टाळाटाळ केली. दिलेल्या माहितीत रूग्णांच्या पूर्ण पत्त्यांसह अन्य काही तपशील दिला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांच्याकडे वारंवार भेटी देऊनही व त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना सूचना देऊनही परिपूर्ण माहिती मिळाली नाही. फीची रक्कम अवाढव्य सांगितली, म्हणजे अर्जदाराने माहिती मागावयाला येऊ नये, असा जन माहिती अधिकाऱ्यांचा प्रयत्न आहे, त्यांच्यावर कारवाई व्हावी. तसेच निधीच मिळाला नसला तरी एक लाखाहून अधिक रक्कम त्यांनी कोठून खर्च केली याचे उत्तर मिळावे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांनी केले.

श्री.देशपांडे यांना त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून चार दिवसांत शुल्क रुपये १४१०/- कळविले होते. परंतु शुल्क न भरता त्यांनी मूळ अर्जातील काही माहिती नको असल्याचे कळविले, त्यामुळे मूळ अर्जानुसार ऊर्वरित माहिती आठ दिवसांत देण्यात आली. ही माहिती मूळ कागदपत्रांच्या सत्यप्रती असल्यामुळे चुकीची माहिती कोणती, हे श्री.देशपांडे यांनी स्पष्ट केलेले नाही. मूळ अर्जानुसार माहिती अपुरी असल्याचे ते म्हणत आहेत. परंतु त्यांनी नको म्हटलेली व

कार्यालयाकडे नसलेल्या एका परिपत्रकाची माहिती वगळता सर्व माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.व्ही.व्ही.पोटे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.आर.एम.जगदाळे यांनी केले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी माहिती पुन्हा देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.विजयसिंह जाधव यांनी लेखी व तोंडी नमूद केले. रूग्णांची नावे, पत्ते ते मागू शकतात, मात्र रूग्णाच्या रोग निदानाची माहिती अशा प्रकारे सरसकट उपलब्ध करून देणे वैद्यकीय अचारसंहितेच्या दृष्टिनेही योग्य व अपेक्षित नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.१.२०१०**